महाराष्ट्र शासन

# तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

दूरध्वनी क्र.०२०-२५६५६२३४/२५६५७१७६
Email ID : ropune@dtemaharashtra.gov.in
४१२ ई शिवाजीनगर, पुणे ४११ ०१६.

जा.क्र. तंशिविकापु/विवि/ससा/२०२०/१३५५ दिनांक १४/०३/२०२०

**परिपत्रक**

प्रति,
प्राचार्य/संचालक,
पुणे व पिंपरी चिंचवड शहर या मधील विभागीय कार्यालयाचे
अधिनस्त सर्व व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या संस्था.

विषय :- कोरोना विषाणूच्या प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रभावी उपाययोजना करणेबाबत.
संदर्भ : -०१.मा.विभागीय आयुक्त,पुणे यांचे पत्र क्र.पीए/पीईआर/२६०/२०,दि.१३/३/२०२०
०२.या कार्यालयाचे परिपत्रक क्र. १३५३ दिनांक १४/०३/२०२०

कोरोना विषाणूच्या प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रभावी उपाययोजना म्हणून मा.विभागीय आयुक्त पुणे यांनी संदर्भिय कमांक ०१ अन्वये दिलेल्या निर्देशानुसार पुणे व पिंपरी चिंचवड शहर या मधील शैक्षणिक संस्था व महाविद्यालये पुढील आदेशापर्यंत बंद ठेवण्याबाबत निर्देश दिलेले आहेत.

त्यानुसार या कार्यालयाने संदर्भ कमांक ०२ अन्वये परिपत्रक निर्गमित केले आहे ते **रदद** करण्यात येत असून नव्याने खालील प्रमाणे सूचना निर्गमित करण्यात येत आहेत.

प्राप्त निर्देशानुसार सर्व संबंधीतांना कळविण्यात येते की, कोरोना विषाणूच्या वाढत्या संसर्गाच्या अनुषंगाने प्रतिबंधक उपाय योजनेच्या दृष्टीने या विभागीय कार्यालयाच्या अधिनस्त **पुणे व पिंपरी चिंचवड शहरातील सर्व संस्था/महाविद्यालयातील अध्यापनाचे कामकाज दिनांक १४ मार्च २०२० पासून पुढील आदेश मिळेपर्यंत बंद ठेवण्यात यावे. मात्र प्रशासकीय व इतर कामकाज नियमित सुरु राहणार असल्याने संस्था/महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी कामावर उपस्थित रहावे.**

ज्या विद्यार्थ्यांना सुटी दिलेली आहे ते अनावश्यकरित्या बाहेर फिरणार नाहीत, वसतीगृहामध्ये, त्यांच्या घरामध्ये स्वत:ला सुरक्षित ठेवतील. जे विद्यार्थी बाहेर गावाहून आले आहेत त्यांच्या बाबतीत ते अनावश्यक बाहेर फिरणार नाही, अशी स्पष्ट सूचना त्यांना देण्यात यावी. अन्यथा त्यांना त्यांच्या मुळ गावी जाण्याच्या सूचना देण्यात याव्यात. जे विद्यार्थी पुणे आणि पिंपरी चिंचवड शहरात राहत असतील त्यांना सदर सूचना निर्देशनास आणून द्याव्यात. कोणी विद्यार्थी अनावश्यकरित्या शहरात फिरताना आढळल्यास त्यांच्या विरुध्द कार्यवाही होवू शकेल याची जाणीव त्यांना करुन द्यावी.

तसेच असे कळविण्यात येते की, कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी आवश्यक त्या सर्व उपाययोजना व खबरदारी घेण्यात यावी. तसेच वैद्यकीय सोयीसुविधांसाठी आवश्यक भासल्यास महानगरपालिकेचे वैद्यकीय अधिकारी यांचा सल्ला घेण्यात येवून त्यांच्या पर्यवेक्षकीय नियंत्रणाखाली कार्यवाही करावी. जर यापैकी काही व्यक्तींना कोरोना विषाणूचा प्रादुर्भावाची लक्षणे आढळल्यास त्यांना नायडू हॉस्पिटलमध्ये स्थलांतरीत करण्यात यावे. उपरोक्त सूचना आपल्या संस्था/महाविद्यालयामधील सर्व अध्यापक,कर्मचारी,वसतीगृह कुलमंत्री व विद्यार्थी यांना निर्देशनास आणून द्याव्यात.

(डॉ.दि.रा.नंदनवार)
प्र.सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,पुणे.

प्रत - मा.संचालक,तंत्रशिक्षण संचालनालय, ३ महापालिका मार्ग मुंबई ४०० ००१ यांना माहितीस्तव सादर.
मा.आयुक्त विभागीय आयुक्त कार्यालय, विधानभवन पुणे ४११ ००१ यांना माहितीस्तव सादर.
मा.जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे यांना माहितीस्त सादर.

C:\Users\ropune\Desktop\bhilave.docx

---

# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

**(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)**

**परिपत्रक क्र. ७८/२०२०**

प्राप्त निर्देशानुसार सर्व संबंधितांना कळविण्यात येते की, कोरोना विषाणूच्या वाढत्या संसर्गाच्या पार्श्वभुमीवर प्रतिबंधक उपाय योजनेच्या दृष्टीने विद्यापीठातील सर्व शैक्षणिक विभागामधील तसेच पुणे व पिंपरी-चिंचवड शहरातील सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्नित सर्व महाविद्यालये / मान्यताप्राप्त सर्व परिसंस्थामधील अध्यापनाचे कामकाज शनिवार, दिनांक १४ मार्च, २०२० पासून पुढील आदेश मिळेपर्यंत बंद ठेवण्यात यावे. मात्र प्रशासकीय व इतर कामकाज नियमित सुरु राहील.

ज्या विद्यार्थ्यांना सुट्टी दिलेली आहे ते अनावश्यकरित्या फिरणार नाहीत तसेच वसतिगृहामध्ये, त्याच्या घरामध्ये स्वत:ला सुरक्षित ठेवतील. जे विद्यार्थी बाहेर गावाहून आले आहेत त्यांच्याबाबतीत ते अनावश्यक फिरणार नाही, ही स्पष्ट सुचना देण्यात यावी. अन्यथा त्यांना त्यांच्या मूळ गावी जाण्याच्या सुचना देण्यात याव्यात. जे विद्यार्थी पुणे आणि पिंपरी-चिंचवड शहरात राहतील त्यांच्याही निदर्शनास ही बाब आणावी. कोणी अनावश्यकरित्या शहरात फिरताना आढळल्यास त्यांच्या विरुध्द कार्यवाही होऊ शकेल, याची जाणीव त्यांना द्यावी.

**विद्यापीठांच्या व इतर परीक्षा नियोजित वेळापत्रकानुसारच होतील. वर जे बंधन घालण्यात आलेले आहे किंवा शहरामध्ये न फिरण्याच्या ज्या अपेक्षा व्यक्त केलेल्या आहेत त्या परीक्षार्थी विद्यार्थ्यांना लागू राहणार नाही. त्यासाठी त्यांनी परीक्षेचे प्रवेशपत्र (हॉल तिकिट) सोबत बाळगावे व आवश्यक असल्यास ते दर्शवावे. परीक्षेबाबत शासनाचे काही वेगळे आदेश प्राप्त झाल्यास तसे कळविण्यात येईल.**

**(डॉ.प्रफुल्ल पवार)**
**कुलसचिव**

गणेशखिंड, पुणे ४११ ००७.
जावक क्र. एएन/१३७९
दिनाकं : १३/०३/२०२०

**प्रत माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी :-**

१. मा.विभागप्रमुख, सर्व शैक्षणिक विभाग
२. सर्व शाखाप्रमुख, सर्व प्रशासकीय विभाग
३. मा.प्राचार्य, विद्यापीठाशी सर्व संलग्नित महाविद्यालये
४. मा.संचालक, विद्यापीठाच्या मान्यताप्राप्त सर्व परिसंस्था

आपणास विनंती की, सदर परिपत्रक आपल्या विभागातील सर्व संबंधितांच्या निदर्शनास आणावे.